दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

www.raigadnagari.com
/ raigadnagari

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

वर्ष २० वे | अंक २७१ | MAHMAR/2006/17212 | रायगड | सोमवार, दि.२९ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

### मुंबईत 'हाताला 'वंचित'ची साथ

# महापालिका निवडणुकीसाठी काँग्रेस-वंचितची युती जाहीर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु असून, मुंबईत सर्वात मोठी राजकीय खळबळ उडाली आहे. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी अखेर काँग्रेस आणि प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीची युती अधिकृतपणे जाहीर करण्यात आली आहे. आज झालेल्या पत्रकार परिषदेत या दोन्ही पक्षांनी एकत्र लढण्याचा निर्धार व्यक्त केला.

या नव्या समीकरणानुसार, जागावाटपाचा आकडाही समोर आला आहे. मुंबईत काँग्रेस तब्बल १५६ जागांवर आपले उमेदवार उभे करणार आहे असं सांगितलं जात आहे. तर वंचित बहुजन आघाडीला ६२ जागा देण्यात आल्या आहेत. याची बद्दलच अधिकृत पत्रकी वंचितच्या सोशल मीडियावरुन शेअर करण्यात आलं आहे. सध्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) सोबतही चर्चा सुरू असली, तरी सध्या त्यांना केवळ ९ जागांचा प्रस्ताव दिला असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे ते स्वबळावर लढण्याची शक्यता राजकीय वर्तुळात आहे.



दुसरीकडे, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनीही युती केल्याने मुंबईत 'मराठी व्होट बँक' विरुद्ध 'महायुती' आणि 'काँग्रेस-वंचित' असा त्रिकोणी संघर्ष पाहायला मिळणार आहे. पुण्यात मात्र महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यात थेट लढत होण्याची चिन्हे आहेत. या सर्व घडामोडींमुळे मुंबईच्या महापौरपदावर कोण बसणार, याकडेही संपूर्ण राज्याचे लक्ष असणार आहे.

त्यामुळे आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची ऐतिहासिक युती अखेर निश्चित झाली आहे. सोशल मीडियावर जारी करण्यात आलेल्या अधिकृत पत्रकानुसार, मुंबईतील एकूण २२७ जागांपैकी ६२ जागांवर वंचित बहुजन आघाडी आपले नशीब आजमावणार आहे.

या निर्णयाला वंचितचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी ऑनलाइन बैठकीद्वारे हिरवा कंदील दाखवला आहे. विशेष म्हणजे, या ६२ जागांच्या यादीवर दोन्ही पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या स्वाक्षऱ्या असून, यात आता कोणताही बदल होणार नसल्याचे सांगण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने वॉर्ड क्र. ६, ११, १२, ८४, ९५, १२७, १५३ आणि २२५ यांसारख्या महत्त्वाच्या मतदारसंघांचा समावेश 'वंचित'साठी करण्यात आला आहे.

वंचित काँग्रेसमधील युतीमुळे दलित, मुस्लिम, बहुजन मतांचं विभाजन टाळता येणार आहे. ज्याचा या दोन्ही पक्षांना मोठा फायदा होऊ शकतो. या युतीमुळे मुंबईतील राजकीय समीकरणांमध्ये मोठी उलथापालथ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलिसांची धडक कारवाई

# १ पिस्टल सह ६ जिवंत काडतुसे जप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलिसांनी शहरातून १ पिस्टल सह ६ जिवंत काडतुसे जप्त करून एकाला अटक केली आहे.

पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने गोपनीय बातमीदाराच्या बातमीच्या आधारे पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात साफळा लावून एक इसमास पिस्टल व ६ जिवंत काडतुसाह मिळून आल्याने त्यास ताब्यात घेतले.

अनंथ अधिमुलम पाडायची (वय-३६ रा सानपाडा) असे या इसमाचे नाव असून त्याच्यावर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कामगिरी वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी सचिन पोवार, सपोनी सुनील वाघ, पोउपनि किरण राउत, पोहवा प्रवीण पवार, पोना भोसले, पोशि काकडे, पोशि कराड, पोशि लोखंडे यांनी केली



# खोपोलीतील काळोखे हत्याप्रकरणी नऊ जण ताब्यात

### रायगड पोलीसांनी २४ तासात आवळल्या मुसक्या

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

भर रस्त्यात मंगेश काळोखे यांच्यावर धारदार शस्त्राने वार करून त्यांना ठार करण्यात आले होते. ही घटना शुक्रवारी (दि.२६) सकाळी घडली होती. या घटनेचा तपास करून रायगड पोलिसांनी नऊ जणांच्या मुसक्या आवळल्या आहेत. यामध्ये एका महिलेचा देखील समावेश आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागासह वेगवेगळ्या पोलीस ठाण्यातील पाच पथकांमार्फत आरोपींचा वेगवेगळ्या मार्गाने शोध घेण्यात आला आहे .

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, खोपोली परिसरातील रहाटवडे येथील रहिवासी असणारे सामाजिक कार्यकर्ते मंगेश काळोखे हे शुक्रवारी सकाळी खोपोली येथील शिशु मंदिर स्कुलमध्ये मुलीला सोडण्यासाठी गेले होते. त्यानंतर ते परत येत असताना खोपोलीमधील विहार येथील जया बार चौकात आल्यावर सकाळी सात वाजण्याच्या सुमारास काही मारेकऱ्यांनी कोयता, तलवार व कुऱ्हाड या धारदार शस्त्रांनी वार करून काळोखे यांच्यावर जिवघेणा हल्ला केला. त्यांच्या शरीरावर वार झाल्याने ते गंभीर जखमी झाले होते. त्यामध्येच त्यांचा मृत्यू झाला.

याप्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात मारेकऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सामाजिक व राजकीय दृष्ट्या हा गुन्हा अतिसंवेदनशील होता. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधिक्षक आंचल दलाल व अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्या मार्गदर्शनाखाली पाच पथक तयार करण्यात आले. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे, खोपोलीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुजित गडदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज ठाकरे, खालापूरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी, पोलीस उपनिरीक्षक अशोक जगताप, रसायनीचे पोलीस उपनिरीक्षक मंगेश बाचकर, नेरळचे सहाय्यक पोलीस निरीक्षक वरोटे व त्यांच्या पथकाने वेगवेगळ्या मार्गाने शोध सुरू केला.



या दरम्यान, मारेकऱ्यांनी मोबाईल फोन बंद करून ठेवला होता. मात्र, ते मुंबई व अन्य ठिकाणी पळून गेल्याचे निष्पन्न झाले होते. आरोपींच्या ठाव ठिकाणाची निश्चित माहिती नव्हती.

अखेर पथकाने मोठ्या कौशल्याने मारेकऱ्यांचा शोध घेतला. निघृण हत्या करून पसार झालेले व मदत करणारे रविंद्र देवकर, दर्शन देवकर, धनेश देवकर, उर्मिला देवकर, विशाल देशमुख, महेश धायतडक, सागर मोरे, सचिन खराडे, दिलीप पवार या नऊ जणांच्या मुसक्या २४ तासात आवळण्यात रायगड पोलीसांना यश आले.

# नवर्षात वाजणार जिल्हा परिषद, पंचायत समित्यांचा बिगुल

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील ३२ जिल्हा परिषदांपैकी १२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पैकी १२५ पंचायत समित्यांची निवडणूक २१ दिवसांत संपविली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर मिनी मंत्रालयाचा बिगुल जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात वाजणार आहे. ८ जानेवारीपूर्वी या निवडणुकीची आचारसंहिता लागू शकते, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील उमेदवारांचे आरक्षण काढताना २० जिल्हा परिषदांनी व २११ पंचायत समित्यांनी आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने त्याची निवडणूक थांबविली आहे. आता पहिल्यांदा आरक्षण मर्यादेचे पालन केलेल्या १२ जिल्हा परिषदांचीच निवडणूक होणार आहे. त्यात सोलापूर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर या जिल्हा परिषदा आहेत. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचा बिगुल वाजणार, याची सर्वांनाच उत्सुकता आहे. आता राज्य निवडणूक आयोगाने १२ जिल्हा परिषदा व १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीची तयारी केली असून, ८ ते १० जानेवारीदरम्यान त्याची घोषणा होईल, असेही सूत्रांनी सांगितले. बाकीच्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुका मात्र ३१ जानेवारीनंतरच होतील. तत्पूर्वी, जानेवारी-फेब्रुवारीत मुदत संपणाऱ्या पाच हजारांहून अधिक ग्रामपंचायतींची निवडणूक होईल.

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमध्ये आरक्षण काढताना ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्याने २० जिल्हा परिषदांसह २११ पंचायत समित्यांची निवडणूक लांबली आहे. त्यावर २१ जानेवारीला सुनावणी असून, न्यायालयाच्या आदेशानंतरच पुढील कार्यवाही होण्याची दाट शक्यता आहे.



### आता लोकलप्रवास सुस्साट...

### वांद्रे ते अंधेरी, कल्याण-कर्जत, पनवेल-कळंबोली...

# नव्या ७४९ लोकल फेऱ्या

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई उपनगरी रेल्वे आणि लांब पल्ल्यांच्या गाड्यांमधून सर्वसामान्यांच्या सुकर आणि सुरक्षित प्रवासासाठी मध्य आणि पश्चिम रेल्वेने राष्ट्रीय योजनेच्या अंमलबजावणीला सुरुवात केली आहे. नव्या मेगा टर्मिनसच्या बांधणीसह विद्यमान टर्मिनसमध्ये फलाट विस्तार आणि नव्या मार्गिका उभारण्यात येत आहेत. त्यामुळे २०३० पर्यंत मध्य आणि पश्चिम रेल्वेवर नव्या ७४९ लोकल फेऱ्या आणि १३३ नव्या मेल-एक्स्प्रेस सेवेत येणार आहेत.



मुंबईसह देशातील प्रमुख ४८ शहरांमधील रेल्वे क्षमता दुप्पट करण्याची राष्ट्रीय योजना केंद्र सरकारने हाती घेतली आहे. यासाठी वापरात असलेल्या पायाभूत सुविधांमध्ये वाढ करून सन २०३० पर्यंत नव्या रेल्वेगाड्या चालवण्यात येणार आहेत. तत्काळ, अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा तीन टप्प्यांत प्रवासी वहनक्षमतेत वाढ होणार आहे.

पनवेल-कळंबोली मेगा टर्मिनससह लोकमान्य टिळक टर्मिनस-दोन, कल्याण, परळ टर्मिनस यांमुळे एकूण २२ फलाट आणि ३६ मार्गिका रेल्वेगाड्या हाताळण्यासाठी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे नव्या ६८ मेल-एक्स्प्रेस हाताळणे शक्य होणार आहे. यात ३० एक्स्प्रेसच्या प्राथमिक देखभालीचा समावेश आहे. सध्या मध्य रेल्वेवरील मुंबईतून ८२ मेल-एक्स्प्रेस धावतात. १५ डब्यांसाठी फलाट विस्तार, कल्याण यार्डातील कामे, कल्याण-कसारा आणि कल्याण-कर्जत तिसरी-चौथी मार्गिका, पनवेल फलाट क्रमांक ४ची पुनर्बांधणी ही कामे पूर्ण झाल्यानंतर ५८४ नव्या लोकल फेऱ्या चालवणे शक्य होणार असल्याचे मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

मुंबई सेंट्रल ते डहाणू रोडदरम्यान रेल्वे मार्गिकांचे जाळे वाढवण्यात येत आहे. यासाठी विरार ते डहाणू रोड तिसरी-चौथी मार्गिका, बोरिवली ते विरार पाचवी-सहावी मार्गिका आणि मुंबई सेंट्रल ते बोरिवली पाचवी-सहावी मार्गिका, नायगाव-जूचंद्र दुहेरी मार्गिका असे एकूण ७ हजार ३३ कोटी रुपयांचे प्रकल्प आहेत. नव्या वर्षाच्या मध्यावधीपर्यंत तीन फलाटांचे जोगेश्वरी टर्मिनस वापरात येणार आहे. दोन फलाटांचे वसई रोड येथील नवे टर्मिनस डिसेंबर २०२७ पर्यंत सुरू होणार आहे.

तत्पूर्वी, विद्यमान दादर, वांद्रे आणि मुंबई सेंट्रल टर्मिनसमध्ये नव्या चार मार्गिकांची भर पडणार आहे. परिणामी आवश्यकतेनुसार विद्यमान मेल-एक्स्प्रेसला रोज ७० डबे जोडण्याचे पश्चिम रेल्वेचे नियोजन आहे. टर्मिनस आणि रुळांचे जाळे विस्तारल्यानंतर लोकल आणि मेल-एक्स्प्रेस वाहतूक स्वतंत्र होणार असून त्यामुळे १६५ नव्या लोकल सुरू करणे शक्य होणार आहे. त्याचबरोबर गोरेगाव-बोरिवली हार्बर मार्गिका कार्यान्वित होईल. वांद्रे ते अंधेरीदरम्यान १५ डबा लोकल फेऱ्या वाढवण्यात येणार आहेत.

नव्या रेल्वेगाड्या सुरू करण्यापूर्वी रेल्वे स्थानकांतील प्रवासी क्षमतेत वाढ करण्यासाठी आवश्यक तिथे डेकची उभारणी करण्यात येत आहे. सिग्नलचे अद्यवतीकरणासह गाड्यांना हाताळण्यासाठीच्या विविध सुविधांची उभारणी विभागीय स्तरावर करण्यात येत आहे, असे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# वाईन शॉपमध्ये भीषण राडा ; शॉपची तोडफोड



**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघरमधील गोल्ड कॉईन वाईन मार्टमध्ये मद्यधुंद तरुणाने धिंगाणा घालत भीषण राडा केल्याची घटना घडली. दारूच्या नशेत असलेल्या तरुणाने रात्रीच्या सुमारास वाईनशॉपमध्ये घुसून लाकडी बांबूने नामफलक व इतर साहित्याची तोडफोड केली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला.

घटनेच्या वेळी तरुणाने दुकानासमोर मोठा गदारोळ केला. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे पाहून स्थानिक नागरिकांनी हस्तक्षेप करत संबंधित तरुणाला चोप देत ताब्यात घेतले. त्यानंतर खारघर पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. खारघर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मद्यधुंद तरुणाला ताब्यात घेतले.

या प्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील चौकशी सुरू आहे. या घटनेमुळे परिसरातील व्यापारी व नागरिकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी अशा प्रकारच्या गैरप्रकारांवर कठोर कारवाईची मागणी स्थानिकांनी केली आहे.


# हसीना यांना पुन्हा सांभाळा !

बांगलादेश इंटरनॅशनल क्राइम्स ट्रिब्युनलने सध्या भारताच्या आश्रयाला असलेल्या पदच्युत पंतप्रधान शेख हसीना तसेच त्यांच्या अवामी लीग सरकारमधील गृहमंत्री असादुझ्झमान खान कमाल या दोघांना दीड वर्षापूर्वीच्या विद्यार्थी आंदोलनातील अपराधांसाठी फाशीची शिक्षा सुनावल्याचा जगाला धक्का वगैरे बसलेला नाही. अशा सुनावण्यांचा फार्स कसा असतो, निकाल आधीच कसा ठरलेला असतो, याविषयी अधिक बोलण्याची गरज नाही. या दोघांसोबत पोलिसप्रमुख चौधरी अब्दुल्ला अल-मामून यांनाही कोर्टाने दोषी ठरविले. तथापि, त्यांनी देशाची व न्यायालयाची माफी मागितल्याने आणि माफीचा साक्षीदार बनून हसीना-कमाल यांच्या कथित अपराधांची सगळी माहिती दिल्याने त्यांना शिक्षेतून माफी देण्यात आली आहे. हादेखील न्यायाच्या फार्सचा भाग आहे. भारताच्या दीर्घकालीन मित्र असलेल्या शेख हसीना गेल्या वर्षी ५ ऑगस्टपासून भारताच्या आश्रयात आहेत. कमाल हेदेखील भारतात असल्याचे मानले जाते. १९७१ च्या बांगलादेश मुक्तिसंग्रामातील योद्ध्यांच्या वारसांना नोकऱ्यांमध्ये ३० टक्के आरक्षणाच्या विरोधात त्या देशातील विद्यार्थी जून २०२४ मध्ये रस्त्यावर उतरले होते. सरकारने ते आंदोलन चिरडून टाकण्याच्या प्रयत्न केला. परिणामी, भयंकर हिंसा झाली. जवळपास १४०० जणांचे जीव गेले. लष्कराकडे सूत्रे सोपविण्यात आली. तेव्हा, लष्करानेच दगाफटका केला. सरकार कोसळले. पंतप्रधानांचे निवासस्थान व इतर इमारती बेचिराख झाल्या. शेख हसीना यांना जीव वाचवून पलायन करावे लागले. नोबेल विजेते मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वात काळजीवाहू सरकार सत्तेवर आले. आता न्या. मोहम्मद गुलाम मोर्तुझा मजुमदार यांच्या नेतृत्वातील त्रिसदस्यीय लवादाने हिंसाचाराला उत्तेजन, आंदोलक विद्यार्थ्यांची हत्या आणि कर्तव्य पार पाडण्यात निष्क्रियता या आरोपांखाली हसीना तसेच माजी गृहमंत्री, तत्कालीन पोलिसप्रमुखांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आहे. त्यांचे हे अपराध मानवतेविरुद्ध असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. शेख हसीना यांनी या शिक्षेचा निषेध करतानाच हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयात दाद मागण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. मृत्युदंडाच्या शिक्षेचा हा निकाल शेख हसीना यांच्यासाठी जीवन-मरणाचा प्रश्न आहेच; पण, भारतासाठीही हा कसोटीचा क्षण आहे. दोन देशांमध्ये प्रत्यार्पणाचा करार झालेला असल्याने युनूस सरकारने हसीना यांच्या प्रत्यार्पणाची भारताकडे मागणी केली आहे. त्याला अद्याप भारताने प्रतिसाद दिलेला नाही. कराराशी बांधील राहून हसीना यांना कसे सांभाळायचे, हा पेच भारतापुढे असेल. या पेचातून मार्ग काढायचा, युनूस यांना प्रादेशिक राजकारणातील भारत-बांगलादेश मैत्रीचे महत्त्व पटवून द्यायचे, अमेरिकाधार्जिणा पाकिस्तान एकाकी पडेल, असे डावपेच राबवायचे की, बांगलादेशच्या न्यायव्यवस्थेचा आदर करण्याच्या नावाखाली हसीना यांना युनूस सरकारकडे सुपुर्द करायचे, हा निर्णय भारताला घ्यायचा आहे. यापैकी दुसरा पर्याय भारतासाठी नवी संकटे उभी करणारा ठरू शकतो; कारण भारत, चीनवर नजर ठेवण्यासाठी बांगलादेशात हवाईतळ उभारण्याची अमेरिकेची योजना धुडकावून लावणाऱ्या शेख हसीना यांचे अवामी लीग सरकार पाडण्यातील अमेरिकेची भूमिका, तसेच सीआयए, आयएसआय, जमात-ए-इस्लामी, आदींची कट-कारस्थाने लपून नाहीत. माजी गृहमंत्री कमाल यांनी 'इन्शाल्लाह बांगलादेश' या पुस्तकात या कारस्थानांचा पर्दाफाश केला आहे. विशेषत: अमेरिकेच्या मदतीने मोहम्मद युनूस यांनी पडद्यामागून सूत्रे हलवली. हसीना यांचे नातेवाईक, लष्करप्रमुख जनरल वकार-उझ-झमान यांनीच पंतप्रधानांच्या पाठीत खंजीर खुपसला, हे कमाल यांचे गौप्यस्फोट धक्कादायक आहेत. इंटरनॅशनल रिपब्लिकन इन्स्टिट्यूटच्या अहवालात बांगला देशातील आंदोलन, सरकारच्या गच्छंतीचा संबंध युद्धाच्या खाईत लोटलेला युक्रेन, सीरिया आदींच्या राजकारणाशी जोडला गेला आहे. यूएसएआयडीच्या माध्यमातून विद्यार्थी आंदोलनाला पैसा पुरवला, प्रशिक्षण दिले. अमेरिकेच्या प्रभावातील जागतिक माध्यमांनी त्या जेन-झी आंदोलनाचे महिमामंडन केले. ही सर्व परिस्थिती पाहता, या शिक्षेनंतर शेख हसीना यांना सांभाळणे भारताचीही गरज आहे. ५० वर्षांपूर्वी, १५ ऑगस्ट १९७५ च्या पहाटे बंगबंधू शेख मुजीबूर रहमान व त्यांच्या कुटुंबीयांच्या निर्घृण हत्याकांडावेळी जर्मनीत असल्याने शेख हसीना, त्यांचे पती डॉ. वाजेद व बहीण रेहाना सुदैवाने वाचल्या. बांगलादेशनिर्मितीत महत्त्वाचे योगदान देणाऱ्या इंदिरा गांधी यांनी त्यानंतर सहा वर्षे या कुटुंबाचा दिल्लीत सांभाळ केला. आता अर्ध्या शतकानंतर तशीच वेळ शेख हसीना यांच्यावर आली आहे. भारताने त्यांना पुन्हा सांभाळायला हवे.

# पाणी मिळत नसल्याने ओलिताखालील शेती धोक्यात

**दै.रायगड नगरी । खांब**

रोहा तालुक्यात कोलाड पाटबंधारे विभागाचे कालव्याचे पाणी अनेक वर्षांपासून दुरुस्तीच्या नावाखाली बंद असल्याने विभागातील शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे पाणी सोडण्याची मागणी अनेकदा केली मात्र त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे पुन्हा दिसून येत आहे. येथील विभागीय शेतकऱ्यांनी याबाबत प्रशासनाला अनेकदा निवेदन दिले आहे आणि पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली. मात्र त्यावर पाटबंधारे खात्याचे केवळ आश्वासनेच दिली. या चुकीच्या धोरणांमुळे ओलिताखाली येणारी शेतजमीन नापीक होण्याच्या मार्गावर असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे येथील बळीराजा आता अक्षरशः संतापाच्या भूमिकेत असल्याचे दिसून येत आहे.



कुंडलिका सिंचन डोळवहाळ बंधारे रोहा तालुक्यातील सुरू असलेले उजवातीर डावातीर कळवा गेली अनेक वर्ष दुरुस्तीच्या नावाखाली बंद असल्याने पाटाच्या ओलिताखालील उजवातीर कालवा खांब, देवकान्हे, धामणसई या विभागातील शेतकऱ्यांना डोळवहाल सिंचनातून कोलाड पाटबंधारे विभाग अनेक वर्षे पाणी देत नाही. संबंधित कालवा दुरुस्तीची कामे करण्यात आली असली तरी शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही.तर येत्या वर्षात तसेच येथील देवकान्हे, धानकान्हे, चिल्हे, तळवली तर्फे अष्टमी या शेतकरी ग्रामस्थानी एकत्रित येऊन एकजुटीने खात्याला ऑक्टोबर नोव्हेंबरमध्ये कालव्यातील गाळ कचरा साफसफाई वेळेत पूर्ण करून उन्हाळी हंगामातील भातशेती लागवडीसाठी डिसेंबरपर्यंत पाणी सोडण्यासाठी आग्रही मागणी निवेदनातून केली होती.

तर सदरच्या निवेदन देण्यात आले प्रसंगी खात्याने स्वीकारून शेतकऱ्यांना दिलासादायक आश्वासन देत लगेचच कालव्याची सफाई करण्यात येणार आणि डिसेंबर १५ पर्यंत पाणी सोडले जाईल असे सांगण्यात आले तर कालव्याची साफसफाई होऊन तब्बल महिना उलटून गेला डिसेंबर महिना देखील या दोन दिवसात उलटून जाईल अद्याप कालव्याला पाण्याचा पत्ता नाही तर येथील बळीराजा शेतात धान पेरणीच्या तयारीत असून यासाठी पाटबंधारे विभाग शेतकऱ्यांना पाणी देण्यासाठी टाळाटाळ का करते. १५ डिसेंबर रोजी पाणी सोडण्याचे आश्वासन दिले होते.

अद्याप पाण्याचा पत्ता नाही त्यावर कुठे माशी शिंकली शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी नाही व्यापारी धोरणांसाठी आहे का असा सवाल उपस्थित होत आहे. गेली पंधरा वर्षे पाटबंधारे खात्याच्या आडमुठेपणाच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांची शेती उद्ध्वस्त होतेय. १५ डिसेंबरला पाणी सोडण्याचं आश्वासन दिलं, पण कुठे माशी शिंकली? शेतीची कामं लांबणीवर पडली.जबाबदार कोण?पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंते आणि वरिष्ठ अधिकारी मुख्यतः जबाबदार आहेत. त्यांचा हलगर्जीपणा आणि दुर्लक्ष शेतकऱ्यांना पाण्यापासून वंचित ठेवतंय.

शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन भंग झाल्याचे समोर आले आहे तर १५ डिसेंबरला पाणी सोडण्याचे जाहीर आश्वासन होते, पण धरणात पाणी असूनही शेतकऱ्यांना मिळाले नाही. यामुळे रब्बी हंगामाच्या पिकांची पेरणी रखडली. शेतकऱ्यांचं नुकसानशेतीची कामं उशिरा होतायत, उत्पादन घटणार. धनिकांना प्राधान्य, साध्या शेतकऱ्यांना दुर्लक्ष. कालव्याची साफसफाई कामे देखील पूर्ण झाली असल्याचे दिसून येत आहे तर धरणात पाणी असूनही उपासमार शेतकरी राजाची होते अशी स्थिती निर्माण होत आहे.

येथील कालवा गेली पंधरा वर्षापासून दुरुस्तीच्या नावाखाली बंद करण्यात आले होते. त्याचे काम देखील पूर्ण तत्वावर आहे शेतकऱ्यांना पाणी सोडावे यासाठी येथील सारे शेतकरी एकत्रित येऊन पाटबंधारे विभागाला निवेदन दिले. दरवर्षी निवेदन देण्यात येतो मात्र यावर्षी कालव्याला पाण्यासाठी आग्रही मागणी केली होती यावर्षीचा खरिपाचे पिक अवकाळी पावसामुळे कुजून गेला त्याची नुकसान भरपाई अद्याप मिळाली नाही. दरम्यान, कोलाड पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

# हाशिवरे विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

हाशिवरे हितवर्धक मंडळ संचलित महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय हाशिवरे.वैजाळी इंग्रजी माध्यम व वैजाळी प्राथमिक शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा गुरुवार (दि.२५) रोजी पार पडला.

या कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा साहित्यिक संजीव म्हात्रे यांच्या उपस्थित संपन्न झाला. तसेच दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम शुक्रवार (दि२६) सौ. अश्विनी मयेकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला. तसेच चित्रकला,रांगोळी प्रदर्शन , वार्षिक पारितोषिक वितरण,समारंभ अशा विविध कलागुणांनी परिपूर्ण सोहळा पार पडला. वरील दोन्ही दिवसांचे सूत्रसंचालन अर्चना पुरो व वर्षा नाईक यांनी केले.तसेच बी.जी.शिकारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात पार पडला.

मुख्याध्यापक बी. डी. गायकवाड, प्राथमिक विभाग ऋतुजा पाटील , प्रज्ञा धसाडे , प्रतिभा म्हात्रे ,पर्यवेक्षक एन.डी.प्रबळकर संकुलातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियोजनातून सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून मंत्रालयाचे सहाय्यक नगर रचनाकार पियुष घरत हे होते.या वेळी हाशिवरे हितवर्धक मंडळाच्या उपाध्यक्षा सरोज डाकी,सचिव अनिल मोकल, सल्लागार सुबोध मोकल , खजिनदार ड.शैलेश मोकल,सदस्य निशिकांत मोकल, सदस्या,मालती मोकल,मिलिंद मोकल, द.र.मोकल गुरुजी व कृष्णा पाटील उपस्थित होते.प्रिया दोरवे यांनी उपस्थितांचे आभार मानले. मनोरंजनाचे कार्यक्रम २६ डिसेंबर व २७ डिसेंबर २०२५ रोजी संध्याकाळी साजरे झाले.



# चिरनेर येथे विविध प्रकारची फळझाडे लावून श्रीधर मोकल यांनी जोपासली सामाजिक बांधिलकी

**दै.रायगड नगरी । उरण**



शालेय विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी प्रेम, जिव्हाळा व आपलेपणाचे नाते निर्माण व्हावे, त्याचबरोबर त्यांना विविध फळ झाडांची माहिती व त्या झाडांच्या उपयुक्ततेचे महत्व कळावे. यासाठी चिरनेर येथिल प्राथमिक शाळेच्या प्रांगणात, चिरनेर येथील सामाजिक भान जपणारे, निसर्गप्रेमी तथा निवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी श्रीधर मोकल यांच्या संकल्पनेतून व स्वखर्चातून विविध प्रकारच्या फळझाडांची लागवड २६ डिसेंबर ते २८ डिसेंबर या कालावधी दरम्यान करण्यात आली असून, चिरनेर परिसरामध्ये मोकल यांच्या सामाजिक कार्याचे व निसर्ग प्रेमाचे कौतुक केले जात आहे.

या फळ झाडांमध्ये चिकू, फणस, पल बोर, करमत, स्ट्रॉबेरी, पांढरी जांभूळ, सूपर पेरू, अवाकॅडो, मलबारी नारळ, सफरचंद, चिंच, संत्र, लिंबू, सिताफळ, हनुमान फळ, रुमानिया एटीएम आंबा, मलबेरी, थाई एटीएम आंबा, एग्ज फ्रुट, हनुमान फळ, आवळा, अंजीर, रोज पल, अननस यासारख्या ५० प्रकारच्या फळझाडांची व मोरपंखी, कागदी सारखी फुल झाडांची तसेच शोभेच्या झाडांची लागवड करण्यात आली आहे. या झाडांच्या लागवडीबरोबर संवर्धनाची जबाबदारी श्रीधर मोकल यांनी घेतली आहे. तर उपक्रमाला उरण वनपरिक्षेत्राकडून विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

फळझाडांच्या लागवडी दरम्यान सरपंच भास्कर मोकल, प्राथमिक शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन म्हात्रे, माजी अध्यक्ष प्रविण म्हात्रे, महिला व बाल विकास अधिकारी साधना मोकल, मुख्याध्यापक बळीराम पाटील, चिरनेर ग्रा. पं. सदस्य समाधान ठाकूर, भारती ठाकूर, समिर डुंगीकर, संदिप चिर्लेकर, मनोज नारंगीकर, हिमंत केणी, पुनम गोंधळी, सुनिता पिचड, विणा साळुंके, कृष्णा व्यापारी, अशोक कांबळे, रामचंद्र म्हात्रे, निलेश ठाकूर, जयेश खारपाटील , निर्भय म्हात्रे, महेश सुतार, शिवप्रसाद पंडीत, रोशन थळी, गिता नवाळे, पुष्पलता म्हात्रे, पल्लवी विश्वे, गोवर्धन पाटील, किशोर पाटील, चांद शेख, संगम म्हात्रे, रंजना म्हात्रे, सुधाकर कातकरी यांच्यासह अन्य ग्रामस्थ व शाळेचे शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# स्थानकातील सरकता जिना धूळखात

**दै.रायगड नगरी । नेरळ**

मध्य रेल्वेच्या नेरळ जंक्शन स्थानकात प्रवाशांच्या सोयीसाठी सरकता जिना उभारण्यात आला आहे.स्थानकातील मध्यवर्ती ठिकाणी हा सरकता जिना उभारण्यात आला असून अद्याप कार्यान्वित करण्यात आला नाही. सध्या या जिन्यावर प्लास्टिकचे आवरण टाकण्यात आले असून तो धूळखात पडला आहे. त्यामुळे नेरळ प्रवासी संघटनेने हा सरकता जिना सुरू करण्याची मागणी केली आहे.



मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील कर्जत दिशेकडे असलेल्या नेरळ जंक्शन स्थानकाचा कायापालट केला जात आहे. या स्थानकात प्रवासी वर्गाच्या सोयीसाठी नव्याने विकासकामे केली जात आहेत. ही विकासकामे करताना प्रवाशांच्या सोयीला प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच, या नेरळ जंक्शन स्थानकातून माथेरानसाठी मिनीट्रेन सोडली जात असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी असते. त्यात मुंबईकडून येणाऱ्या उपनगरीय लोकलमधून देखील प्रवासी नेरळ स्थानकात अधिक संख्येने येत असतात.ही बाब लक्षात घेऊन नेरळ स्थानकात फलाट क्रमांक एकवर एकाच वेळी तीन पादचारी पूल तसेच सरकता जिना कार्यान्वित केला आहे.

मात्र, या स्थानकात उभारण्यात आलेला दुसरा सरकता जिना अद्याप कार्यान्वित झालेला नाही. हा सरकता जिना फलाटाच्या मध्यभागी असल्याने वृद्ध प्रवासी वर्गासाठी मदतगार ठरणार आहे. मात्र, नेरळ स्थानकातील प्रशासनाकडून हा सरकता जिना कार्यान्वित करण्यात आलेला नाही. सध्या त्यावर प्लास्टिकचे आवरण टाकले असून तो धूळ खात पडला आहे. त्यामुळे हा सरकता जिना उद्घाटना अभावी बंद आहे की, कामाच्या निकृष्ट दर्जेमुळे त्यात काही तांत्रीक अडचणी आहेत, असा प्रश्न सध्या प्रवासी वर्गातून उभा होत आहे. तसेच, याबाबत प्रवासी वर्गाकडून नेरळ रेल्वे प्रवासी संघटनेकडे सातत्याने मागणी होत आहे. त्यामुळे मध्य रेल्वे प्रशासनाने तत्काळ हा सरकता जिना कार्यान्वित करावा, अशी मागणी नेरळ रेल्वे प्रवासी संघटनेकडून अध्यक्ष संदीप म्हसकर यांनी नेरळ स्थानक प्रबंधक पाटील यांच्याकडे केली आहे.

# पनवेलमध्ये रुग्णोपयोगी साहित्य केंद्राचा शुभारंभ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरात गरजू रुग्णांसाठी अत्यल्प दरात रुग्णोपयोगी साहित्य भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देणारे केंद्र सुरू झाले आहे. सेवाभारती कोकण प्रांत ट्रस्ट यांच्या माध्यमातून पनवेल येथील डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालयात हे केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे.

या उपक्रमासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या महर्षी वाल्मिकी शाखा व नंदनवन शाखेतील सेवाभावी स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. सेवाभारती संस्थेकडून काही प्राथमिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले असून, उर्वरित व्यवस्था स्वयंसेवकांनी स्वेच्छेने दिलेल्या देणग्यांतून उभारण्यात आली आहे.या केंद्रासाठी आवश्यक जागा व प्राथमिक सहकार्य डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालयाकडून देण्यात आले आहे. साहित्य वाटप, नोंदवही ठेवणे तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांशी प्रेमळ संवाद साधण्याची जबाबदारी शाखेतील स्वयंसेवक पार पाडणार आहेत. हे केंद्र आठवड्याचे सातही दिवस सायंकाळी ५ ते ७ या वेळेत सुरू राहणार आहे.

या केंद्रामार्फत फाउलर बेड, एअर बेड, वॉटर बेड, ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर, व्हील चेअर, वॉकर, कमोड चेअर, नेब्युलायझर, वॉकिंग स्टिक, विविध प्रकारचे पॉट व काही वैद्यकीय बेल्ट यांसारखे साहित्य अत्यल्प भाडे व डिपॉझिटवर उपलब्ध करून दिले जाणार आहे. भविष्यात या साहित्यात आणखी भर घालण्याचा मानस आहे. या केंद्राचे औपचारिक उद्घाटन प्रथितयश डॉक्टर डॉ. ययाती गांधी यांच्या हस्ते झाले. यावेळी कोकण प्रांत संघटक सुरेंद्र शर्मा, डायबेटोलॉजिस्ट डॉ. कीर्ती समुद्र, पनवेल नगर संघचालक राकेश फाटक तसेच सेवाभारती कोकण प्रांताचे अविनाश धाट उपस्थित होते.



आपण देत असलेली सेवा व्यावसायिक नसून समाजाशी नाते जोडणारी असली पाहिजे. ही सेवा तळागाळातील गरजूंपर्यंत पोहोचली पाहिजे आणि संघाच्या निस्वार्थ सेवेचा आदर्श समाजासमोर ठेवला पाहिजे, असे मनोगत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.या केंद्राचे प्रमुख म्हणून अमोल शेटे तर सहकारी म्हणून प्रकाश चांदवडकर व भुस्कुटे हे काम पाहणार आहेत. हे केंद्र सुरू करण्यासाठी संघाचे कार्यकर्ते तसेच पटवर्धन रुग्णालयातील श्री. लघाटे, प्रसन्ना खेडकर आदींनी विशेष परिश्रम घेतले. याच कार्यक्रमात सुरेंद्र शर्मा यांनी सेवाभारतीच्या विविध सेवाकार्यांची माहिती दिली.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत ओंकार श्रीहरी बिडवे व इतर (खाता क्र. १०१३) यांच्या मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहेत. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे खोपटे (कचेरपाडा), येथील मिळकत भूमापन/सर्व्हे नं. २७/४/अ यांसी एकूण क्षेत्र ००.४८.०० हे. आर. प्र., पोटखराबा ०.०४.०० हे. आर. प्र., यांसी आकार रक्कम रुपये ४.२६ पैसे, पैकी खाता क्र. १०१३ च्या क्षेत्रासाठी यांसी चतुःसीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त,

रायगड, तारीख: २९ डिसेंबर २०२५.

सही/-

**श्री. विनायक र. ताम्हणकर, वकिल**

**खरेदीदारातर्फे वकिल**

**३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३.**

**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२.**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

रायगड नगरी सोमवार, दि.२९ डिसेंबर २०२५

# उलवे मधील अनधिकृत जाहिरात होर्डिंग्ज सिडकोने पाडले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उलवेतील पुष्पक नगर परिसरात अटल सेतू लगत असलेल्या सर्व्हे नंबर ९२/२/२ येथील सिडको अधिसूचित व संपादित जागेवर अनधिकृतपणे उभारण्यात आलेले सहा अनधिकृत जाहिरात होर्डिंग पाडण्याची कारवाई सिडकोच्या अनधिकृत बांधकामे विभागाने केली. या सहा जाहिरात होडींगने सिडकोचे अंदाजे ४६२ चौ. मीटर क्षेत्रफळ जागेवर अतिक्रमण केले होते.

सदर जाहिरात होडींग सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करुन तसेच सिडको महामंडळाची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आले होते. त्यामुळे सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार तसेच मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली सहा अनधिकृत जाहिरात होर्डिंगवर निष्कासन कारवाई करण्यात आली.

## पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५

# स्वीप अंतर्गत विविध शाळांमध्ये मतदार जनजागृती कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक - २०२५ च्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेच्या स्वीप उपक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी सी.के.टी. स्कूल, नवीन पनवेल, दि. बा. पाटील शाळा महानगरपालिका शाळा क्र. १, के.एल.ई. महाविद्यालय, कळंबोली ,महानगरपालिका शाळा क्र. ५ मोठा खांदा येथे नुकतेच विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभाग नोंदवून मतदानाबद्दल सकारात्मक संदेश दिला. पनवेल महानगरपालिकेच्या वतीने मतदान जनजागृतीसाठी निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत महापालिकेच्या क्षेत्रातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये चित्रकला, निबंध लेखन, पत्र लेखन, वक्तृत्व, रांगोळी आणि पोस्टर मेकिंग या प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी सर्जनशील कल्पनांच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व, जबाबदारी आणि लोकशाही मूल्ये प्रभावीपणे मांडली. येत्या १५ जानेवारीला महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्ये रुजावित, जबाबदार मतदाराचे व मतदानाचे महत्व लक्षात यावे, मतदानाबाबत जागरूकता वाढवावी या उद्देशाने मतदान जनजागृतीसाठीच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये महापालिकेच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत श्री. चंद्रकांत जाखू म्हात्रे (खाता क्र. ४९३ साठी) यांच्या मालकी हक्क व कब्जे वहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहेत. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका पेण, मे. दुय्यम निबंधक, पेण, रायगड, जिल्हा रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे नारवेल, येथील मिळकत भूमापन /सर्व्हे नं. ११ यांसी एकूण क्षेत्र ०.८३.०० हे. आर. प्र., पोटखराबा ०.०३.०० हे. आर. प्र., यांसी आकार रक्कम रुपये ११.१८ पैसे, पैकी खाता क्र. ४९३ च्या क्षेत्रासाठी यांसी चतुःसीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त,
रायगड, तारीखः २९ डिसेंबर २०२५.

सही/-
**श्री. विनायक र. ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारातर्फे वकिल**
**३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर,**
**मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३.**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२.**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थि सौ.गीता प्रकाश पालरेचा यांच्या मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहेत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल**

| गट नं. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| २९ | ०-७६-०० | ०.१५ |
| ३२ | ३-४०-०० | ०.६२ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील सौ.गीता प्रकाश पालरेचा यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : २९/१२/२०२५

सही/-
**श्री.नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
**मु. पो. पाली भोईआळी,**
**ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५**
**मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थि सौ.क्षमा संजय ओसवाल यांच्या मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहेत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल**

| गट नं. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| १०९/२ | ०-६७-०० | ०.३० |
| ११४ | ०-०८-०० | ०.०३ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर करावी.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील सौ.क्षमा संजय ओसवाल यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : २९/१२/२०२५

सही/-
**श्री.नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
**मु. पो. पाली भोईआळी,**
**ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५**
**मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थि सौ.गीता प्रकाश पालरेचा यांच्या मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहेत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल**

| गट नं. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| २७/२ | ०-८२-०० | ०.१५ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर करावी.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील सौ.गीता प्रकाश पालरेचा यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : २९/१२/२०२५

सही/-
**श्री.नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
**मु. पो. पाली भोईआळी,**
**ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५**
**मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थि श्री.राहुल प्रकाश ओसवाल व इतर १ यांच्या मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहेत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल**

| गट नं. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ११३ | ०-३०-०० | ०.०६ |
| ११७/३ | ०-१६-०० | ०.०६ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर करावी.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील श्री.राहुल प्रकाश ओसवाल व इतर १ यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : २९/१२/२०२५

सही/-
**श्री.नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
**मु. पो. पाली भोईआळी,**
**ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५**
**मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत श्री. सुजित रामभाऊ पाटील यांच्या मालकी हक्क व कब्जे वहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहेत. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका पेण, मे. दुय्यम निबंधक, पेण, रायगड, जिल्हा रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे नारवेल, येथील मिळकत भूमापन /सर्व्हे नं. ७३/१ यांसी एकूण क्षेत्र ०.३४.२० हे. आर. प्र., पोटखराबा ०.०१.०० हे. आर. प्र., यांसी आकार रक्कम रुपये १.४३ पैसे, यांसी चतुः सीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त,
रायगड, तारीखः २९ डिसेंबर २०२५.

सही/-
**श्री. विनायक र. ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारातर्फे वकिल**
**३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर,**
**मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३.**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२.**

---

## जाहीर नोटीस

या नोटीस द्वारे तमाम जनतेला कळविण्यासाठी आहे की आमच्या अशिल मे. सनसिटी कनंस्ट्रक्शन तर्फे श्री. रविंद्र वसंत भोईर ऑफिस पत्ता १०२, श्री. रामकृष्णा निवास को. हौ. सो भुखंड क्र.४६ आणि ४७, सेक्टर ४२, सीवुड, नेरुळ, नवी मुंबई हे खालील वर्णनाचा भुखंड सनसिटी एव्हेन्यु को. हौ. सोसायटीच्या नावे हस्तांतर करणार आहेत.

**मालमत्तेचे वर्णनः सनसिटी एव्हेन्यु को. हौ. सोसायटी, भुखंड क्र. २७१, सेक्टर १०, खारघर**

ज्या व्यक्ती/व्यक्ती/व्यक्तींना विक्री, देवाणघेवाण, गहाणखत, भेटवस्तू, ट्रस्ट, वारसा, मृत्युपत्र, ताबा, भाडेपट्टा, धारणाधिकार, सुविधा विकास किंवा इतर कोणत्याही प्रकारे त्यांचा/तिचा/त्यांचा दावा किंवा हितसंबंध आहे/त्यांनी असा दावा करावा आणि ही सार्वजनिक सूचना प्रकाशित झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी कागदपत्रासह खालील पत्यावर भेटावे कागदपत्रासहित.

दिनांक : २८/१२/२०२५
ठिकाण : नवी मुंबई

सही/-
**ॲड.सौ.रेखा होवाळे**
**शॉप नं.१३, प्रभात सेंटर,**
**सीबीडी बेलापूर, नवी मुंबई**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थि सौ.गीता प्रकाश पालरेचा यांच्या मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहेत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल**

| गट नं. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ३८ | ०-८९-०० | ०.३१ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर करावी.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील सौ.गीता प्रकाश पालरेचा यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : २९/१२/२०२५

सही/-
**श्री.नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
**मु. पो. पाली भोईआळी,**
**ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५**
**मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.**

---

मे.राणे सो

ॲड.अनिकेत पी. चौधरी
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१७१४/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.२९/०१/२०२६

कै. बालकृष्ण रामजी गायकवाड मयतचे वारस
कै. चंद्रभागा बालकृष्ण गायकवाड (मयत पत्नी)
१) श्री. प्रशांत बालकृष्ण गायकवाड
वय - ३७ वर्षे, धंदा नोकरी,
रा. घर नं. १४३, मु. आसुडगाव, पो. कळंबोली,
ता. पनवेल, जि. रायगड
२) श्रीमती. चांगुणा नामदेव गायकवाड
वय - ६६ वर्षे, धंदा गृहीणी,
रा. घर नं. १३९, बुध्द मंदिरा जवळ,
पो. कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड
३) श्रीमती. मीना लहु जाधव
वय- ४९ वर्षे, धंदा- गृहीणी,
रा. घर नं. १३९/ बी, मु. आसुडगाव,
पो. कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, कै. बालकृष्ण रामजी गायकवाड हयांचे निधन दि. २३/०९/१९९७ रोजी मु. आसुडगाव, पो. कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड येथे निधन राहत्या घरी झालेले असुन येथे झाल्याने श्री. प्रशांत बालकृष्ण गायकवाड, वगैरे हयांनी कै. बालकृष्ण रामजी गायकवाड यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | यु.के.नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| आसुडगाव | ६६ | २९ | ० | ०-२७-३ | १.५० |
| आसुडगाव | ६५/६६ | ३४ | १ | ०-४१-२ | १.५० |
| | | ३४ | ३ | ०-३२-४ | १.५० |

वरील सामाईक संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै. लक्ष्मण रामजी गायकवाड यांना सिडकोकडून मौजे कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड येथे भूखंड क्रं सी/२२ए, सेक्टर-४७, क्षेत्र ९०० चौ. मी. सिडको फाईल नं ७९ हा भूखंड वितरीत करण्यात येणार आहे. श्री. प्रशांत बालकृष्ण गायकवाड, वगैरे हे कै. बालकृष्ण रामजी गायकवाड यांचे कायदेशिर वारस आहेत हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया में. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्री. प्रशांत बालकृष्ण गायकवाड, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. बालकृष्ण रामजी गायकवाड यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक २२/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल |
|---|---|---|

---

मे.राणे सो

ॲड.अनिकेत पी. चौधरी
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१७१३/२०२५
नि.नं.८
ने.ता.२९/०१/२०२६

कै. कानु रामजी गायकवाड मयतचे वारस
कै. भागीरथी कानु गायकवाड (मयत पत्नी)
१) कै. चंदर कानु गायकवाड (मयत मुलगा)
१/१) श्री. दिपक चंदर गायकवाड
वय-५३ वर्षे, धंदा- शेती,
१/२) श्रीमती. शिप्ला चंदर गायकवाड
वय ४४ वर्षे, धंदा- गृहीणी,
वरील १/१) व १/२) रा. आसुडगाव,
पो. कळंबोळी, ता. पनवेल, जि. रायगड.
१/३) श्रीमती. सुनिता रविंद्र चितले
वय-५३ वर्षे, धंदा-गृहीणी, रा. चावंडोली,
पो. गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड.
२) कै. हरिश्चंद्र चंदर गायकवाड (मयत नातु)
२/१) श्रीमती. उषा हरिश्चंद्र गायकवाड
वय- ४९ वर्षे, धंदा- गृहीणी,
२/२) श्री. ऋषिकेश हरिश्चंद्र गायकवाड
वय-२७ वर्षे, धंदा- शेती,
वरील २/१) व २/२) रा. आसुडगाव,
पो. कळंबोळी, ता. पनवेल, जि. रायगड.
२/३) श्रीमती. रोहीणी संदिप ओव्हळ
वय- ३७ वर्षे, धंदा- गृहीणी,
२/४) श्रीमती. पुजा विशाल ओव्हळ
वय- ३४ वर्षे, धंदा- गृहीणी,
वरील २/३) व २/४) रा. खोपोली,
पेण रोड, मु. ताकई, ता. खलापुर जि. रायगड.
२/५) श्रीमती. कोमल योगेश खंडागळे
वय- ३०वर्षे, धंदा- गृहीणी,
मु.चिंचपाडा, ता.पेण, जि. रायगड
३) कै. दत्ता कानु गायकवाड
३/१) श्रीमती. आशा दत्ता गायकवाड
वय - ६७ वर्षे, धंदा- गृहीणी,
रा. घर नं.८८. पाण्याच्या टाकी जवळ, सेक्टर ४.
आसुडगाव, पो. कळंबोळी, ता. पनवेल, जि. रायगड.
३/२) श्री. रविंद्र दत्तात्रेय गायकवाड
वय-४५ वर्षे, धंदा- शेती.
रा. आसुडगाव, पो. कलंबोली, ता. पनवेल, जि. रायगड.
३/३) श्रीमती. सुजाता गुरुनाथ जाधव
वय - ३८ वर्षे, धंदा- गृहीणी,
रा. गावदेवी मंदिर, नागाव ठाणे, दहिसर
४) श्री. गोपीनाथ कानु गायकवाड
वय ६५ वर्षे, धंदा- शेती,
घर नं.८८ ए, पाण्याच्या टाकी जवळ, सेक्टर ४,
आसुडगाव, पो. कळंबोळी, ता. पनवेल, जि. रायगड.
५) श्रीमती. मंगळी उर्फ मंगळूबाई नामदेव गाडे उर्फ
जंनाबाई नामदेव गाडे
वय- ७६ वर्षे, धंदा- गृहीणी,
मु. कसळखंड, पो. सोमटणे, ता. पनवेल, जि. रायगड. अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीबारे असे कळविण्यात येते की, कै. कानु रामजी गायकवाड हयांचे निधन दि. १५/०६/१९८६ रोजी मु. आसुडगाव, पो. कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड येथे निधन राहत्या घरी झालेले असुन श्री. दिपक चंदर गायकवाड, वगैरे हयांनी कै. कानु रामजी गायकवाड यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | यु.के.नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| आसुडगाव | ६६ | २९ | ० | ०-२७-३ | १.५० |
| आसुडगाव | ६५/६६ | ३४ | १ | ०-४१-२ | १.५० |
| | | ३४ | ३ | ०-३२-४ | १.५० |

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै. लक्ष्मण रामजी गायकवाड यांना सिडकोकडून मौजे कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड येथे भुखंड क्रं. सी/२२ए, सेक्टर-४७, क्षेत्र ९०० चौ. मी. सिडको फाईल नं ७९ हा भूखंड वितरीत करण्यात आलेला आहे. श्री. दिपक चंदर गायकवाड, वगैरे हे कै. कानु रामजी गायकवाड यांचे कायदेशिर वारस आहेत हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्री. दिपक चंदर गायकवाड, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. कानु रामजी गायकवाड यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक २२/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल |
|---|---|---|

### शेकापला आणखी एक जोरदार झटका....

# शेकापच्या वाहतूक सेल रायगड जिल्हाध्यक्ष जयेंद्र शेळके शेकडो समर्थकांसह भाजपात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महाविकास आघाडीच्या समोर शेकापने शरणागती पत्करली असल्याने शेकापच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर पहायला मिळत आहे. त्यामुळे अनेक कार्यकर्ते शेकापला अखेरचा सलाम करत देशाच्या विकासाची विचारधारा असलेल्या भाजपमध्ये सहभागी होत आहेत. त्याच अनुषंगाने शेकापच्या वाहतूक सेलचे रायगड जिल्हाध्यक्ष व माजी ग्रामपंचायत सदस्य जयेंद्र बबन शेळके यांनी शेकडो समर्थकांसह आज भाजपात जाहीर प्रवेश केला. कालच रोडपाली येथील प्रवेशाच्या धक्क्यातून सावरत नसताना आणखी एक मोठा धक्का शेकापला मिळाला आहे.

लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिका निवडणूक प्रमुख आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते त्यांचे स्वागत करून प्रवेश देण्यात आला. यावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, वासुदेव घरत, पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, प्रभाकर जोशी, प्रल्हाद गायकर, सचिन वास्कर, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

शेकापच्या वाहतूक सेलचे रायगड जिल्हाध्यक्ष व माजी ग्रामपंचायत सदस्य जयेंद्र बबन शेळके यांच्यासोबत ओवे, रांजणपाडा, ओवेकॅम्प, सेक्टर २७, सेक्टर ३४, सेक्टर ३५, भागेश्री सोसायटी, रोहींजण येथील अनेक कार्यकर्त्यांनी त्यांच्या समर्थकांसह भाजपात प्रवेश केला. त्यामध्ये जगदीश शेळके, लहू शेळके, महेंद्र शेळके, अशोक शेळके, कैलास शेळके, भावेश शेळके, कुणाल शेळके, सुभाष शेळके, सुनिल शेळके, हर्ष शेळके, समीर वाघमारे, शादाब शेख, तन्वीर शेख, आफताब शेख, सुफियान शेख, कैलास वास्कर, प्रभाकर वास्कर, महेश वास्कर, संतोष घरत, प्रशांत जोशी, शंकूनाथ गडगे, केतन म्हात्रे, पंढरीनाथ भाग्यवंत, चंदू भोपी, राजन चौधरी, खुटाराम चौधरी, प्रेमाराम चौधरी, बगदराम चौधरी, प्रकाश चौधरी, उमेशराम चौधरी, नेनाराम चौधरी, योगेश भीमराव जाधव, रोहित चव्हाण, दीपक भातोसे, सुशांत साळुंखे, गणेश जाधव, धनंजय साळुंखे, शिवराम जाधव, निलेश जाधव, मुकेश चौधरी, वरूण कांबळे, गौतम कांबळे, लखनभाई, छोटूभाई, कमलाकर पाटील, कुंदन घरत, सिद्धार्थ केणी, जतिन केणी, पियुष खुटारकर, कुणाल खुटारकर व समर्थकांनी भाजपात जाहीर प्रवेश केला. शेकाप ध्येय धोरणे विसरून इतर पक्षाच्या कुबड्या घेऊन चालत आहे. एकेकाळी शानसे राहणाऱ्या शेकापला घरघर वाढली आहे. त्यामुळे शेकापने महाविकासआघाडी समोर एकप्रकारे नांगी टाकली असल्याने शेकापच्या कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम नाराजीचा सूर उमटत आहे. शेकापची आजची अवस्था बिकट झाल्याने शेकापला इतर पक्षांच्या छायेत जगण्याची सवय झाली आहे आणि हीच गोष्ट कार्यकर्त्यांच्या संतापाचे कारण ठरत आहे.

# कार्यकर्त्यांनी संयम राखा सोशल मीडियावर प्रतिक्रिया देऊ नका : खा.सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । कर्जत**

'खोपोलीत काल घटना घडली ती अत्यंत निंदनीय आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने मी या घटनेचा निषेध व्यक्त करतो. तपास यंत्रणेचे काम सुरु आहे. आपल्या जिल्ह्याच्या पोलीस अधिक्षक एक कार्यक्षम अधिकारी आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली योग्य तो तपास होईल. या बद्दल माझ्या मनात संदेह असण्याचे काही कारण नाही. सुधाकर घारे एक सुस्वभावी, जनतेची कदर असणारा जनतेला न्याय देणारा नेता म्हणून कर्जत - खालापूर तालुक्यात निश्चित पणाने आपले एक स्थान जन माणसात निर्माण केले आहे. तपास चालू आहे. त्यामुळे काही बाबतीत मर्यादेमध्ये बोलणे क्रमप्राप्त आहे. तुमच्या मनात अत्यंत अस्वस्थता आहे. याची मला जाणीव आहे. महापालिकेच्या निवडणुकांची प्रक्रिया सुरु आहे. तरी मी येथे आलो आणि अत्यंत संयमाने बोलत आहे. श्रद्धा, सबुरी, संयमामधून सत्य निर्विवादपणे बाहेर येईल. कुणीही आपली प्रतिक्रिया सोशल मीडियावर देऊ नये.' असा सल्ला प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी कार्यकर्त्यांना दिला.



काल खोपोलीत शिवसेना शिंदे गटाच्या नवनिर्वाचित नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे यांची घटनेत निघृण हत्या झाली. त्यामध्ये संशयित म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सुधाकर घारे, जिल्हा प्रवक्ते भरत भगत यांची नावे आल्याने तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी कर्जत मधील जनसंपर्क कार्यालयात येऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला. याप्रसंगी पुंडलिक पाटील, नितीन सावंत, अशोक भोपतराव, सुनील पाटील, भगवान भोईर, एकनाथ धुळे, अंकित साखरे, उमा मुंढे, दीपक श्रीखंडे, संतोष बैलमारे, रंजना धुळे आदी उपस्थित होते.

तटकरे पुढे म्हणाले, 'इथे महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या. त्या फार महत्वाच्या आहेत. या घटने बद्दल मी स्वतः मुख्यमंत्र्यांची भेट घेईन. त्यांच्या कडे एसआयटी ची मागणी देखील करीन. इथे जाहीरपणे बोलणे इच्छित नाही. तुमच्या पैकी अनेकांनी जे आता काही घडले आहे. त्याचा अनुभव वेगळा वेगळ्या पद्धतीने घेतला आहे. कारण सत्य हे सत्य आहे. सत्याची कास धरत त्याच्या पाठीमागे उभे राहणे हे प्रदेशाध्यक्ष म्हणून माझे हजार टक्के कर्तव्य आहे. त्यात तसूभरही कमी पडणार नाही. आपल्या नेतृत्वाच्या कार्यशैली बद्दल सर्वांना विश्वास आहे. महिला वर्गामध्ये आपली समज्यस्य भूमिका ते मांडत असतात. हे सर्वांना माहीत आहे. या घटने नंतर कुणी काय काय केले? हे बाहेरच येईल. यात शंका नाही.

आज सकाळ पासूनच राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसंपर्क कार्यालयात व परिसरात कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. सातत्याने ती वाढत होती. दुपारी सव्वा चारच्या सुमारास सुनील तटकरे जनसंपर्क कार्यालयात आले. त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांबरोबर संवाद साधला. त्यानंतर त्यांनी पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचारांचा कोलाडमध्ये तीव्र निषेध

**दै.रायगड नगरी । रोहा**

बांगलादेशमध्ये सातत्याने हिंदू समाजावर होत असलेले अत्याचार, हिंदूंची घरे जाळणे, दुकाने उद्ध्वस्त करणे तसेच नुकतीच बांगलादेशमध्ये दिपू चंद्रदास या निरपराध हिंदू तरुणाची निर्घृण हत्या झाल्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली आहे. ही घटना केवळ एका कुटुंबावर झालेला अन्याय नसून, संपूर्ण हिंदू समाजाच्या अस्तित्वावर आणि सुरक्षिततेवर झालेला गंभीर घाला असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर सकल मराठा समाज कोलाड पंचक्रोशी यांच्या वतीने काल आंबेवाडी नाका, कोलाड येथे बांगलादेशमध्ये हिंदूंवर होत असलेल्या अत्याचारांचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला. आंदोलनादरम्यान बांगलादेश सरकारविरोधात घोषणाबाजी करत हिंदू समाजावर होणाऱ्या अन्यायाविरोधात ठाम भूमिका घेण्याची मागणी करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी सांगितले की, बांगलादेशमध्ये अल्पसंख्याक हिंदू समाजावर सातत्याने हल्ले होत असून त्यांचे धार्मिक स्वातंत्र्य, जीवित व मालमत्ता धोक्यात आली आहे. हिंदूंची घरे जाळली जात आहेत, दुकाने तोडली जात आहेत आणि निष्पाप नागरिकांची निर्घृण हत्या होत आहे. अशा घटना मानवतेला काळीमा फासणाऱ्या असून आंतरराष्ट्रीय समुदायाने याची गंभीर दखल घेणे अत्यंत आवश्यक आहे. या आंदोलनातून हिंदूंवरील अत्याचार थांबले पाहिजेत, निरपराध हिंदूंचे संरक्षण करा, अशा ठाम घोषणा देण्यात आल्या. सकल मराठा समाज कोलाड पंचक्रोशी यांनी स्पष्ट इशारा दिला की, बांगलादेशातील हिंदूंवरील अन्याय जर थांबला नाही, तर याविरोधात आंदोलनाची तीव्रता वाढवली जाईल. या निषेध आंदोलनाला परिसरातील नागरिकांनीही मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दिला. बांगलादेशातील हिंदू समाजाच्या सुरक्षिततेसाठी भारत सरकारने ठोस व कठोर पावले उचलावीत, अशी एकमुखी मागणी यावेळी करण्यात आली.




# माथेरान शाळेचे रुपडे पालटतेय



**दै.रायगड नगरी । माथेरान**

शहराच्या मध्यवर्ती भागात असणाऱ्या वीर हुतात्मा भाई कोतवाल नगरपरिषदेच्या शाळेचे रुपडे पालटताना दिसत असून याकामी मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली कॅरिंग फ्रेंड्स संस्था मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने येथील वीर हुतात्मा भाई कोतवाल नगरपरिषदेच्या शाळेची डागडुजी त्याचप्रमाणे रंगरंगोटी, परिसराची स्वच्छता, विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी मैदान,उत्तम प्रकारे शौचालय व्यवस्था,परिसरातील जागेत वाचनालयाचे काम लवकरच सुरू करण्यात येणार असून सद्यस्थितीत या शाळेचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलला आहे.

मुख्याध्यापक दिलीप अहिरे, शिक्षक संतोष चाटसे यांसह अन्य शिक्षक वृंद सुध्दा यासाठी मेहनत घेत असून कॅरिंग फ्रेंड्स संस्था मुंबई यांच्या वतीने शाळेच्या छपरावर नुकताच सहा सोलर लावण्यात आले आहेत त्यामुळे विजेची बचत ह्या सोलरमुळे होण्यास मदत होऊ शकते. या अगोदर सुध्दा या कॅरिंग फ्रेंड्स संस्थेच्या माध्यमातून अनेक शालेय उपयोगी साहित्य दिलेले आहे. यासाठी उद्योजक नितीन शहा यांचे मोलाचे योगदान शाळेला मिळत आहे. प्रत्येक वर्गात विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाच्या दृष्टिकोनातून सुंदर सुंदर चित्रे काढण्यात आली असून बाके सुध्दा रंगीत केली आहेत.

सध्या या शाळेची पटसंख्या १६२ इतकी आहे. इंग्रजी भाषा यायला हवी यासाठी बहुतांश पालकवर्ग मुलांना इंग्रजी शाळेत भरती करत असतात.नगरपरिषदेच्या या शाळेत उत्तम प्रकारे शिक्षण मिळत असून अनेक विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात आपल्या कलागुणांना वाव दिलेला आहे. असे असताना देखील मराठी शाळेकडे पालक लक्ष केंद्रित करीत नाहीत.शहराच्या मध्यवर्ती भागात असणाऱ्या या शाळेचे आता पूर्णपणे रुपडे बदलले दिसत आहे. नगरपरिषदेच्या माध्यमातून ही शाळा अधिकाधिक सुंदर व्हावी यासाठी प्रयत्न केले जात आहेत परंतु येथील पालकांनी, सुज्ञ नागरिकांनी सुध्दा आपल्या परीने खारीचा वाटा उचलून एक सामाजिक बांधिलकी म्हणून या शाळेसाठी सर्वतोपरी योगदान देणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे.

# नाताळची सुट्टी व नव्या वर्षाच्या स्वागतासाठी पर्यटकांची गर्दी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

नव्या वर्षाच्या स्वागतासाठी व नाताळाच्या सुट्यांचा पर्यटनासाठी पुरेपूर फायदा घेण्यासाठी पुणे-मुंबईसह महाराष्ट्रातील निरनिराळ्या ठिकाणच्या पर्यटकांची पावले जिल्ह्यातील पर्यटन स्थळांकडे स्थिरा-वली आहेत. गुरुवारी (ता.२५) पासुनच जिल्ह्यातील विविध समुद्र किनारे व पर्यटन स्थळांवर गर्दी वाढली आहे. येथील समुद्र किनारे, मंदिरे, ऐतिहासिक वास्तु, किल्ले, तीर्थक्षेत्र पाहण्यासाठी पर्यटकांसह पर्यटक तसेच शाळकरी व महाविद्यालय सहली विदयार्थ्यांचा ओघ वाढत आहे. यामुळे पर्यटनावर अवलंबून असलेले छोटे-मोठे व्यावसायिक, हॉटेल, खानावळी, दुकानदार यांची सध्या चलती आहे. त्यांच्याकडून पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विविध ऑफर व स्कीम ची लयलूट केली जात आहे. रायगड व कोकणच मनमोहक सौन्दर्य पर्यटकांना नेहमीच खुणावत असत. यंदा एक जानेवारीपर्यंत शेकडो कोटींची उलाढाल या ठिकाणी पर्यटन व इतर व्यवसायांच्या माध्यमातून होणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात येतोय.

जिल्ह्याला विस्तृत आणि मनमोहक समुद्र किनारा लाभला आहे. त्यामध्ये अलिबाग- नागाव, अक्षी, वरसोली, मुरुड- काशिद, श्रीवर्धन- दिवेआगर, हरिहरेश्वर येथील समुद्रकिनारे पर्यटकांना भुरळ घालत आहे. हे सर्व समुद्र किनारे पर्यटकांनी हाऊसफुल्ल झाले आहेत. सर्वच किनार्यांवर बोटींग, घोडागाडी, बाईक राईडची मजा पर्यटक लुटत आहेत. श्रीवर्धन येथील काळींजे व दिवेआगर येथील कंदळवण पर्यटनाचा देखील आनंद लुटत आहे. असे कांदळवन पर्यटन करणारे शंतनु कुवेसकर यांनी सांगितले.

नाताळच्या सुट्या आणि काही दिवसांवर येऊ घातलेले नवे वर्ष यामुळे किनार्यावर जल्लोष करण्यासाठी पर्यटकांनी येथे तळ ठोकूण ठेवला आहे. सर्वच ठिकाणची बुकींग फुल्ल झाली असली तरी देखिल काही हॉटेल व कॉटेज मध्ये ऐन वेळी येणार्या पर्यटकांना राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. काही हॉटेलमध्ये नाताळ व थर्टीफर्स्टच्या पार्टीसाठी खास सुट व आकर्षक ऑफर दिल्या आहेत. ज्यामध्ये राहणे व खाण्यासाठी विशेष कुपनची व्यवस्था करण्यात आली आहे. असे दिवेआगर येथील हॉटेल व्यवसायिक गणेश सावंत यांनी सांगितले.

थंडीचा जोर वाढत असला तरी जिल्ह्यातील प्रसिद्ध असलेले थंड हवेचे ठिकाण माथेरान पर्यटकांनी हाऊसफुल्ल झाले आहे. आठवड्याभरासाठी येथील हॉटेल व लॉज बुक झाले असले तरी येणार्या पर्यटकांची कोणतीच गैरसोय होणार नाही याची काळजी येथील व्यावसायिक घेत आहेत.

शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यावर शिवप्रेमी मोठया संख्येने येत आहेत. गडावर जाण्यासाठी अनेकजण रोपवेला पसंती देत आहेत. त्यामुळे काही काळ रोपवेवर रांगा लावाव्या लागत आहेत. राज्यभरातून शाळेतील विद्यार्थी सुद्धा सहलीसाठी रायगड किल्ल्यावर मोठया प्रमाणात येत आहेत. असे येथील व्यवसायिक अजित औकीरकर यांनी सांगितले.

अष्टविनायकांपैकी दोन गणपती हे रायगडमध्ये आहेत. ते म्हणजे खालापुर तालुक्यातील महडचा वरदविनायक आणि सुधागड तालुक्यातील पालीचा बल्लाळेश्वर, सध्या येथे भाविकांची दर्शनासाठी रीघ लागलेली आहे. आलेल्या भक्तांची राहण्याची सोय करण्यासाठी बल्लाळेश्वर देवस्थानच्या वतीने दोन भक्तनिवासमध्ये अतिशय अल्पदरात चांगली व्यवस्था करण्यात येते. भक्तनिवास भरले तरी इतर खाजगी लॉज देखिल उपलब्ध आहेत. अनेक भक्त महडच्या वरदविनायकाचे दर्शन घेऊन पालीच्या बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी येतात. मंदिराच्या आसपास असलेली फुल, हार, नारळ, प्रसाद, पुजेचे साहित्याची दुकाने सजली आहेत. असे येथील व्यवसायिक राहुल मराठे यांनी सांगितले.

मुरुड आणि अलिबाग समुद्रकिनार्याची मजा लुटतांनाच पर्यटक येथे असलेल्या मुरुड जंजिरा आणि कुलाबा किल्ल्याला आवर्जून भेट देत आहेत. आणि तिथला इतिहास जाणून घेत आहेत. ओहटीच्या वेळी कुलाबा किल्ल्यावर चालत किंवा घोडागाडीने जाता येते. तर भरतीच्यावेळी किल्ल्यावर जाण्यासाठी मोटारबोटची व्यवस्था आहे. जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठीही फेरी बोटींच्या फेर्या सुरु असतात. किल्ल्याची माहिती देण्यासाठी गाईडसुद्धा उपलब्ध आहेत. अलिबागला येण्यासाठी मुंबई-गेटवे ऑफ इंडियावरुन मांडवा व रेवस येथपर्यंत थेट प्रवासी लाँच सेवा उपलब्ध आहे अवघ्या दिड ते दोन तासांमध्ये अलिबागला येता येते.

दक्षिण काशी म्हणुन ओळखल्या जाणार्या श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वरला पर्यटकांसह भाविकांचीही पसंती असते. कारण एकाच ठिकाणी भव्यसमुद्र किनारा आणि देवदेर्शन अशा दोन्ही गोष्टींचा सुरेख संगम तेथे साधता येतो. महाराष्ट्र पर्यटन विभागाने (एमटीडीसी) येथे पर्यटकांसाठी राहण्याची सोय केली आहे. तसेच खाजगी लॉजसुद्धा उपलब्ध आहेत. तेथुनच दिवेआगर आणि श्रीवर्धनच्या समुद्रकिनार्यावर जाता येत. दिव्याअगरला राहण्यासाठी कॉटजची व लॉजची व्यवस्था आहे. एक दिवसासाठी दोन व्यक्तींना राहण्याचा दर १२०० ते १२००० रुपये पर्यंत देखील आहे. असे येथील व्यवसायिक अमित खोत यांनी सांगितले.

उरण जवळील ऐतिहासिक घारापुरी/अजंठा लेणी पाहण्यासाठी कलाप्रेमींची गर्दी होत आहे. येथे जाण्यासाठीही उरण व गेटवे ऑफ इंडियावरुन फेरी बोटीची सेवा उपलब्ध आहे.

